**<u>ठळक बातम्या</u>**

- दिवाळीनिमित्त सर्वत्र रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी, सर्वत्र लक्ष्मीपूजनाचा उत्साह

- यंदा नवरात्रीपासून विविध वस्तूंच्या खरेदीत २५ टक्के वाढ झाल्याचं व्यापाऱ्यांच्या संघटनेच्या सर्वेक्षणात स्पष्ट

- अतिवृष्टी, पुरामुळे बाधित राज्यातल्या शेतकऱ्यांना आता ३ हेक्टरपर्यंतच्या बाधित क्षेत्रासाठी मदत मिळणार

**आणि**

- जपानला पहिल्यांदाच मिळणार महिला प्रधानमंत्री, संसदेकडून ताकाइची सानी यांची निवड

**<><><><><>**

दीपावलीचा सण सर्वत्र उत्साहात साजरा केला जातोय. आज घरोघरी तसंच व्यावसायिक आस्थापनांमध्ये लक्ष्मीपूजन झालं. त्याविषयी सविस्तर जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

**व्हीसी**

*(दिवाळीच्या निमित्ताने बाजारपेठा, घरं आणि कार्यालयं आकर्षक रोषणाईने सजवण्यात आली आहेत. सर्वत्र आनंदाचं आणि मंगलमय वातावरण दिसत आहे. दिवाळीनिमित्त सर्वजण एकमेकांना शुभेच्छा आणि भेटी देत असून, घरोघरी विविध आकारांचे आकाशकंदील आणि मनमोहक रांगोळ्या सर्वांचं लक्ष वेधून घेत आहेत. दिवाळीनिमित्त शास्त्रीय संगीताच्या मैफिलींचं आयोजन ठिकठिकाणी करण्यात आलं आहे. राज्य सांस्कृतिक संचालनालयातर्फे मुंबईत विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत.*

*आज अश्विन अमावस्या म्हणजे लक्ष्मीपूजनाचा दिवस. व्यापारी वर्गासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. गेल्या वर्षभराची खतावणी बंद करून नवीन चोपडी सुरु केली जाते. घरोघरी चलनी नोटा-नाण्यांसह, देवी लक्ष्मीच्या प्रतिमेचं आणि नवीन झाडूचं पूजन झालं. लक्ष्मीपूजनानिमित्त आज शिर्डीच्या साईबाबा संस्थानात साईबाबांच्या समाधी मंदिरात लक्ष्मी-कुबेर पूजन करण्यात आलं.*

*उद्या दीपावली पाडव्याला सोनं-चांदी खरेदीसाठी उत्साहाचं वातावरण असतं. जळगावच्या बाजारपेठेत आज चांदीच्या दरात १ हजार रुपयांची घसरण होऊन ती १ लाख ७० हजार रुपये प्रतिकिलो झाली. तर*

*सोन्याच्या दरातही १०० रुपयांची किरकोळ घसरण होऊन ते तोळ्यामागे 1 लाख २८ हजार रुपये दरानं मिळत होतं.*

*लक्ष्मीपूजनाच्या निमित्तानं शेअर बाजारात आज मुहूर्ताच्या सौद्यांचं सत्र झालं. सत्र संपलं तेव्हा सेन्सेक्स ६३ अंकांची वाढ नोंदवत ८४ हजार ४२६ अंकांवर बंद झाला. निफ्टी २५ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ८६९ अंकांवर बंद झाला.*

*एकिकडे उत्साह असताना दुसरीकडे वाशिम जिल्ह्यात मात्र झेंडुची आवक वाढल्याने दर घसरल्याने झेंडु उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. )*

**<><><><><>**

यंदा नवरात्रीपासून आतापर्यंत खरेदीत गेल्यावर्षीच्या तुलनेत २५ टक्के वाढ झाल्याचं कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सच्या पाहणीत समोर आलं आहे. या कालावधीत ५ लाख ४० हजार कोटी रुपयांच्या वस्तूंची आणि ६५ हजार कोटी रुपयांच्या सेवांची विक्री झाल्याचं संघटनेच्या सर्वेक्षणात आढळून आलं. जीएसटी कपातीमुळं विक्री मोठ्या प्रमाणात झाल्याचं सर्वेक्षणात सहभागी झालेल्या ७२ टक्के व्यापाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दिवाळीनिमित्त देशवासियांना उद्देशून शुभेच्छा पत्र लिहिलं आहे. या पत्रात त्यांनी, पहलगाम दहशतवादी हल्ल्याला निर्णायक प्रतिसाद दिल्याबद्दल ऑपरेशन सिंदूरची प्रशंसा केली आहे.

याशिवाय, यावर्षीची दिवाळी खास आहे कारण, पहिल्यांदाच, देशभरात अनेक जिल्ह्यांमध्ये, दुर्गम भागांमध्ये दिपोत्सव होत आहे. हे असे जिल्हे आहेत जिथे नक्षलवाद आणि माओवादी दहशतवाद मुळापासून नष्ट झाला आहे."

**<><><><><>**

दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात हवेची गुणवत्ता पातळी अतिशय खराब झाली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानं दिलेल्या माहितीनुसार, आज दुपारी दिल्लीत हवेचा गुणवत्ता निर्देशांक ३५७ इतका होता. मुंबईत आज हवेचा गुणवत्ता निर्देशांक

२१० म्हणजे खराब पातळीवर नोंदवला गेला, तर पुण्यात हा निर्देशांक १३०वर, म्हणजेच सामान्य पातळीवर आहे.

<><><><>

यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आता ३ हेक्टरपर्यंतच्या बाधित क्षेत्रासाठी मदत मिळणार आहे. याकरता विशेष बाब म्हणून ६४८ कोटी १५ लाख ४१ हजार रुपयांच्या निधीच्या वितरणाला मान्यता देण्यात आली असल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली. या बाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

सुरुवातीचे पंचनामे दोन हेक्टरपर्यंत झाले होते, आता ते तीन हेक्टरचे होणार आहेत. त्यासाठी नुकसानभरपाईचं वाटप करायला थोडा उशीर होत आहे, अशी कबुली कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. शेतकऱ्यांनी काळजी करू नये, त्यांना मदत करण्यासाठी शासन वचनबद्ध आहे, अशी ग्वाहीही त्यांनी सोलापूरमध्ये दिली. विमा कंपन्यांनी पीक कापणी प्रयोगाची अट न घालता शेतकऱ्यांना विम्याची रक्कम अदा करावी, अशा सूचना दिल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><>

आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी आज पार पडली. या टप्प्यात ११ नोव्हेंबर रोजी १२२ जागांसाठी मतदान होणार असून अर्ज मागे घ्यायची शेवटची तारीख २३ ऑक्टोबर आहे. दरम्यान, या निवडणुकीत जागावाटपाचा करार करण्यात इंडिया आघाडीला अपयश आल्यावरून झारखंड मुक्ती मोर्चानं काँग्रेस आणि राजदवर निशाणा साधला.

<><><><>

पंजाबचे माजी पोलिस महासंचालक मोहम्मद मुस्तफा आणि मंत्री रझिया सुलताना यांच्यावर त्यांच्या मुलाच्या खुनासंदर्भात FIR दाखल करण्यात आला

आहे. मुस्तफा यांची मुलगी आणि सून यांचीही नावे यामध्ये आहेत. मुस्तफा यांचा मुलगा या महिन्याच्या सहा तारखेला मृतावस्थेत सापडला होता. अमली पदार्थाच्या अतिसेवनाने हा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज होता अशी माहिती पंचकुलाच्या पोलिस उपायुक्त सृष्टी गुप्ता यांनी दिली.

<><><><><>

जपानच्या संसदेने ताकाइची सानी यांना जपानच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री म्हणून निवडून दिलं आहे. जपानच्या संसदेच्या वरिष्ठ सभागृहात ताकाईची यांना १२५ मतं मिळाली तर कनिष्ठ सभागृहात त्यांना २३७ मतं मिळाली होती. लिबरल डेमोक्रॅटिक पार्टीच्या नेत्या असलेल्या ताकाइची या जपान इनोव्हेशन पार्टीबरोबर एक नवीन युती सरकार स्थापन करणार आहेत.

१९९३ मध्ये त्यांनी अपक्ष खासदार म्हणून संसदेत प्रवेश केला. शिंजो ॲबे यांच्या मंत्रीमंडळात १९९६ मध्ये त्यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली.

ताकाईची यांची जपानच्या प्रधानमंत्री पदावर निवड झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

फ्रान्सचे माजी अध्यक्ष निकोलास सारकोझी यांनी लिबियाचा हुकूमशहा मुअम्मर गड्डाफी याच्याकडून मिळालेला पैसा २००७ च्या निवडणुकीत वापरल्याच्या आरोपावरून त्यांना पाच वर्षं कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. सारकोझी यांनी मात्र आपण निर्दोष असल्याचा दावा कायम ठेवला असून या निर्णयाविरोधात दाद मागितली आहे.

<><><><><>

रशियाकडून उर्जा आयातीवर युरोपीय महासंघाचे सर्व सदस्य देश जानेवारी २०२८ पासून बंदी घालणार आहेत. लक्सेंबर्ग इथं काल झालेल्या बैठकीत या सर्व देशांच्या उर्जा मंत्र्यांनी या प्रस्तावावर एकमुखाने शिक्कामोर्तब केलं. रशिया - युक्रेन

युद्धानंतर रशियाकडून इंधन तेल खरेदी कमी करत जाण्याचा निर्णय युरोपीय संघाने घेतला होता. त्यानुसार २०२५पर्यंत तेल आयात ३टक्के पर्यंत कमी झाली आहे. मात्र वायू इंधन आयात अद्याप १३ टक्क्यांवर आहे.

<><><><><>

अशियाई युवा कबड्डी स्पर्धांमध्ये भारतीय पुरुष आणि महिला संघांनी विजय मिळवले आहेत. बहारिनमध्ये मनामा इथं सुरु असलेल्या या कबड्डी स्पर्धांमध्ये भारताच्या महिला संघाने इराणवर ५९-२६ असा विजय मिळवून सुवर्णपदकासाठीच्या शर्यतीत जागा मिळवली आहे.

पुरुष कबड्डी संघाने पाकिस्तानच्या कबड्डी संघावर ८१-२६ अशी मात केली. आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धांमधली ही सर्वाधिक फरक असणारी मात आहे.

<><><><><>

यंदाच्या फिडे बुद्धिबळ विश्वचषकाचं अधिकृत चिन्हं आणि गाणं गोव्याचे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी आज एका सोहळ्यात प्रकाशित केलं. दलेर मेहंदी यांनी हे गाणं गायलं आहे. विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, धोरणात्मक विचार आणि नेतृत्वगुण निर्माण करण्यात बुद्धिबळाचं महत्त्व यावेळी मुख्यमंत्री सावंत यांनी अधोरेखित केलं. यंदाची फिडे विश्वचषक स्पर्धा येत्या ३१ ऑक्टोबरला १७ नोव्हेंबर दरम्यान गोव्यात आयोजित करण्यात येणार आहे.

<><><><><>

राज्याच्या अनेक भागात आज पाऊस झाला. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, जालना, अहिल्यानगरच्या विविध भागातून पावसाचं वृत्त आहे. ऐन दिवाळीत पाऊस झाल्यानं सर्वसामान्यांसह शेतकऱ्यांच्या आनंदावर विरजण पडलं. उद्यापासून चार दिवस राज्यभरात वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><>//